# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 07 November 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – ०७ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार जोमाने सुरु, दिग्गज नेत्यांच्या ठिकठिकाणी प्रचारसभा.
- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा वचननामा प्रसिद्ध.
- सरकार लवकरच दहशतवादविरोधी राष्ट्रीय धोरण जाहीर करणार – केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन.

आणि

- अंमलबजावणी यंत्रणांनी आत्तापर्यंत राज्यात केलेल्या कारवाईत सुमारे २८० कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त.

****

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार जोमाने सुरु आहे. राज्यातल्या दिग्गज नेत्यांसह इतर राज्यातल्या नेत्यांच्या देखील ठिकठिकाणी सभा होत आहेत.
औरंगाबाद मध्य मतदार संघात महायुतीचे उमेदवार प्रदीप जैस्वाल यांनी आज मित्र पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत मतदारसंघात पदयात्रा काढली. महायुतीचे औरंगाबाद पूर्व मतदारसंघातले उमेदवार अतुल सावे यांनी आज लोकांशी संवाद साधला.
वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी आज कन्नड मतदारसंघाचे पक्षाचे उमेदवार अयाज मकबूल शहा यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात दोन प्रचार सभा होणार आहेत.

****

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज यवतमाळ जिल्ह्यातल्या उमरखेड मतदारसंघात फुलसावंगी इथं भाजप उमेदवार किसन वानखेडे यांच्यासाठी प्रचारसभा घेतली. महाविकास आघाडी उमेदवारांच्या प्रचारासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आज अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. दर्यापूर, वलगाव आणि बडनेरा इथं ठाकरे यांच्या जाहीर सभा होत आहेत.
भाजपा आणि महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी भाजपाचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांच्या १५ नोव्हेंबरपर्यंत राज्यात पन्नास जाहीर सभा होणार आहेत.
केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी आज अहिल्यानगर जिल्ह्यातल्या कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघांमध्ये राशीन इथं जाहीर सभा घेतली. यावेळी महायुतीचे उमेदवार राम शिंदे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार आज विदर्भ दौऱ्यावर असून, त्यांनी पूर्व नागपूर तसंच गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा आणि काटोल विधानसभा मतदारसंघातल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि महाआघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेतल्या. महाराष्ट्रातल्या जनतेला परिवर्तन पाहिजे आहे असा दावा करत, त्यांनी महायुतीच्या पाच गॅरंटींची माहिती दिली.

****

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा वचननामा आज प्रसिद्ध करण्यात आला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मुंबईत याचं प्रकाशन करण्यात आलं. यावेळी ज्येष्ठ नेते सुभाष देसाई, आमदार अनिल परब यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. हा वचननामा संस्कार, अन्नसुरक्षा, महिला, आरोग्य, शिक्षण, पेन्शन, शेतकरी, वंचित समूह, उद्योग तसंच मुंबईच्या विकासासाठी असलेलं धोरण या प्रमुख घटकांवर आधारीत आहे. हा आपल्या पक्षाचा वचननामा असून महाविकास आघाडीचा सविस्तर जाहीरनामा येत्या काही दिवसात जाहीर होईल, असं उद्धव ठाकरे यांनी यावेळी सांगितलं.

****

येत्या दहा तारखेला मुंबईत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला जाणार आहे. काँग्रेस पक्षाचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. खरगे यांच्यासह लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, अखिल भारतीय काँग्रेस

कमिटीच्या सरचिटणीस प्रियंका गांधी यांच्यासह काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते राज्याच्या विविध भागांत काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात काँग्रेसच्या ज्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतले नाहीत त्या सगळ्या बंडखोरांवर कारवाई करण्यात आली असून, त्यांना सहा वर्षांसाठी काँग्रेसमधून निलंबित करण्यात आल्याचं, तसंच राज्यात कुठेही मैत्रीपूर्ण लढत होणार नसल्याचं चेन्नीथला यांनी सांगितलं.

****

राज्यात येत्या २० तारखेला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन अभिनेत्री सोनाली खरे यांनी केलं आहे.

**बाईट – अभिनेत्री सोनाली खरे**

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज अकोला आणि वाशिम जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

सरकार लवकरच दहशतवादविरोधी राष्ट्रीय धोरण जाहीर करणार असल्याचं प्रतिपादन, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. नवी दिल्ली इथं आज दहशतवाद विरोधी परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. तीन नव्या फौजदारी कायद्यांमुळे नागरिकांच्या अधिकारांचं रक्षण होत असल्याचं शहा म्हणाले. कर्तव्य निभावत असताना हुतात्मा झालेल्या ३६ हजारांहून अधिक पोलिसांना त्यांनी आदरांजली अर्पण केली. राष्ट्रीय तपास संस्थेनं या दोन दिवसीय परिषदेचं आयोजन केलं आहे. केंद्रीय तपास संस्थांचे अधिकारी, न्यावैद्यक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील वरिष्ठ पोलीस अधिकारी यांची परिषदेला उपस्थिती आहे.

****

सरकारी नोकरीची भरती प्रक्रिया सुरू झाल्यानंतर त्याबाबतच्या नियमांमध्ये कोणताही बदल करता येणार नाही, असा नियम सर्वोच्च न्यायालयानं आज सांगितला आहे. सरन्यायाधीश डी.वाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या पाच

न्यायमूर्तींच्या पीठानं स्पष्ट केलं की, भरती प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी ठरवलेल्या त्याबाबतच्या नियमांमध्ये प्रक्रिया सुरू झाल्यावर छेडछाड करता येणार नाही. निवडीचे नियम मनमानीपणाचे नसावेत आणि ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि भेदभावरहित असावी, असंही न्यायालयानं सांगितलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जागृतीसाठी राबवण्यात येणाऱ्या स्वीप कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय संचार ब्यूरो आणि भारत निवडणूक आयोगाच्या वतीनं एक फिरतं प्रदर्शन उद्यापासून सुरू होणार आहे. प्रदर्शन लावलेल्या या गाड्या १५ निवडक जिल्ह्यांमधे मतदानविषयक जनजागृतीचा संदेश घेऊन जाणार आहेत. उद्या मुंबईत आयोजित सोहळ्यात भारत निवडणूक आयोग आणि राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचे वरीष्ठ अधिकारी तसंच चित्रपट, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातल्या मान्यवरांचा उपस्थितीत मतदार जागृती उपक्रमांचा प्रारंभ होणार आहे. याच कार्यक्रमात या फिरत्या प्रदर्शन वाहनांना हिरवा झेंडा दाखवला जाणार आहे.

****

निवडणुकांमध्ये मतदारांना प्रलोभन देण्याची प्रकरणं रोखण्याच्या उद्देशानं अंमलबजावणी यंत्रणांनी आत्तापर्यंत राज्यात केलेल्या कारवाईत, सुमारे २८० कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. यंदाच्या निवडणूक काळातली जप्ती ही २०१९च्या निवडणूक काळाच्या तुलनेत साडेतीन पटीनं जास्त असल्याचं, तसंच यंदाच्या जप्तीत सर्वाधिक म्हणजे चाळीस टक्के प्रमाण मोफत वाटपासाठी आणलेल्या प्रलोभनपर वस्तूंचं असल्याचंही आयोगानं म्हटलं आहे.

****

निवडणूक आयोगानं दिलेल्या निर्देशांनुसार जिल्ह्यातल्या मतदान केंद्रांवर प्राथमिक आरोग्य सुविधा देण्याचं नियोजन करण्यात यावं, असे निर्देश छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज आरोग्य यंत्रणांना दिले. यासंदर्भातल्या बैठकीत ते बोलत होते. मतदान केंद्रांवर द्यावयाच्या वैद्यकीय सुविधांबाबत निवडणूक आयोगाच्या निर्देशांची माहिती यावेळी उपस्थितांना देण्यात आली.

****

बीडचे निवडणूक निरीक्षक एस.मल्लिका यांनी आज गेवराई मतदार संघातल्या जतेगाव, खामगाव, माहर टाकळी फाटा चेक पोस्ट, तसंच मिर्कला गावातल्या संवेदनशील मतदान केंद्रांना भेट दिली. गढीच्या नवोदय विद्यालय इथल्या स्ट्राँग रूमलाही त्यांनी भेट दिली. कर्तव्यावर असलेल्या अधिकारी आणि पोलिस अंमलदार यांना सतर्क राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

****

निवडणूक आचारसंहिता काळात नांदेड जिल्हा राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध मद्य जप्त करण्याची धडक कारवाई सुरू आहे. काल या विभागानं जिल्ह्यात सोळा ठिकाणी धाडी टाकून एकूण ३ लाख ३८ हजार ९८० रुपये मूल्याची दारू जप्त केल्याची माहिती नांदेडचे राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक गणेश पाटील यांनी दिली. या कारवाईत सोळा जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

****

अवैध मद्यविक्री आणि वाहतूक प्रकरणी धुळे जिल्ह्यात आतापर्यंत एकूण ७६ गुन्हे दाखल झाले असून ९३ लाख दोन हजार ९७८ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर शहरात सुत गिरणी चौकात पोलिसांनी ४० लाख रुपये रोख रक्कम जप्त केली. याप्रकरणी चौकशी सुरु असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****